# प्रकरण पहिले

## प्रस्तावना :

स्वतंत्र भारताने लोकशाही शासनव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. व विकेंद्रीकरण ही लोकशाहीच्या दृष्टीने एक अत्यावश्यक बाब आहे. विकेंद्रीकरणांतर्गत सत्तेची विभागणी केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्यामध्ये करण्यात आली. या विकेंद्रीकरणांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यात आलो. ग्रामीण भागात ग्राम्स्तरावर ग्रामपंचायत, तालुका स्तरावर पंचायत समिती व जिल्हास्तरावर जिल्हापरिषदेची निर्मिती करण्यात आली. तर शहरी भागासाठी नगरपालिका, महानगरपालिका, नगरपरिषद व कटकमंडळाची निर्मिती करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठीचे ३०% राखीव जागेचे धोरण महाराष्ट्रात १९९० मध्ये अंमलात आले. त्यानंतर ७३ व्या ७४व्या घटनादुरुस्तीने या धोरणाची अंमलबजावणी राष्ट्रीय पातळीवर करण्यात आली आणि ३०% ऐवजी ३३% आरक्षण लागू करण्यात आले. सदर घटनादुरुस्तीने S.C व S.T करिता हे आरक्षण दिले आहे. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासांसाठी (O.B.C) राज्यानी विशेष उपाययोजना करण्याबाबत तरतुदही केली आहे. O.B.C. आरक्षण पुरविलेल्या राज्यात महाराष्ट्र राज्याचा अंतर्भाव होतो. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३% आरक्षण मिळाल्यामुळे महिलांना सामाजिक व राजकीय सहभागाची एक नवी संधी प्राप्त झाली, यामुळेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थातील महिलांच्या सहभागाम्ध्ये फरक पडल्याचे जाणवते. महाराष्ट्रातील २२ महानगपालिकांपैकी कोल्हापूर महानगरपालिकेमधील, स्त्री-पुरुष सदस्यांचा तुलनात्मक अभ्यास हा माझ्या प्रबंधाचा विषय आहे.

'महिला आणि राजकारण' हा अभ्यास विषय बराच काळ दुर्लक्षित राहिला पण महिलांसाठी राखीव जागा ठेवण्याच्या निर्णयानंतर महिला अणि राजकारण या विषयाचे अनेक पैलू संशोधनातून समोर येऊ लागले. आपल्या समाजात फार पूर्वीपासूनच स्त्रियांचे स्थान पुरुषांचा तुलनेत दुय्यम आहे आणि हे दुय्यम स्थान बदलले पाहिजे हे जवळजवळ सर्वांनीच मान्य केले आहे. भारतीय शासन व्यवस्था ही 'उदारनतवादी लोकशाही व्यवस्था' असून स्वातंत्र्य व समानता हे हक्क घटनेने सर्वांना प्राप्त झाले आहेत. याचाच अर्थ धर्म,

वंश, जाती, लिंग इत्यांदीच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जाऊ नये, या दृष्टिकोनानुसार खरे तर सर्वच क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता अभिप्रेत आहे, पण वास्तवात कोणत्याच सामाजिक, आर्थिक, राजकीय किंवा शैक्षणिक क्षेत्रात स्त्री-पुरुषांचा समान सहभाग दिसून येत नाही. स्वातंत्र्याची ६० वर्षे उलटून गेल्यावर सुध्दा आजही सर्वच क्षेत्रात पुरुषांचेच वर्चस्व दिसून येते. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर किंवा स्वातंत्र्यपूर्वकाळातही स्त्रियांचा राजकारणात फारसा सहभाग नव्हता व आजही त्यामध्ये फार मोठा बदल झालेला नाही.

**<u>महिलांच्या राजकीय सहभागाची पार्श्वभूमी :</u>**

फार पूर्वीपासून भारतात पितृसत्ताक कुटुंबपद्धती चालत आलेली आहे. त्यामुळे घरात व घराबाहेरही स्त्रीच्या वाट्याला नेहमीच दुय्यम स्थान आले आहे. तरीही महाराष्ट्रात प्रभावी स्त्रियांची परंपरा खूप जुनी आहे. महाराष्ट्रात उपलब्ध असलेले सर्वात जुने वाङ्मय महानुभाव पंथाचे आहे. त्या वाङ्मयात चक्रधरांच्या महादाइसा, कमळाइसा, हिराइसा, या स्त्री-शिष्यांना असलेले महत्व समजते. भागवत संप्रदायात मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा यांना नानाचे स्थान होते. त्यांचा तत्कालीन जनमानसावर मोठा प्रभाव होता. नंतर जिजाबाई, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई, ताराबाई, उमाबाई दाभाडे या पराक्रमी स्त्रियांचा प्रभाव जाणवतो [१] तथापि अशा व्यक्तिशः कर्तृत्ववान असलेल्या राज्यकर्त्या घराण्यातल्या स्त्रिया वगळता चळवळीच्या स्वरुपात सर्वसामान्य स्त्रियांसाठी झालेले प्रयत्न किंवा स्त्रियांचे सामूहिक प्रयत्न १९ च्या शतकापूर्वी आढळत नाहीत.१९ व्या शतकामध्ये परंपरेने चालत आलेल्या अनेक अनिष्ट प्रथा, परंपरा मोडून समाजपरिवर्तन करण्याचे प्रयत्न भारतात प्रथम पश्चिम बंगालमध्ये व त्यानंतर महाराष्ट्रास सुरु झाले. या कार्यात पुरुष समाजसुधारकांचा मोठाच पुढाकार होता. महाराष्ट्रात महात्मा फुले, महर्षी कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल शिंदे यांच्या अथक प्रयत्नाने स्त्रियांवरील बंधने काही प्रमाणात कमी झाली.

१९२० नंतर महात्माजींच्या प्रेरणेने स्त्रिया राजकारणात उतरु लागल्या. त्यांची तत्वे व शिकवण स्त्रियांना प्रेरणादायक ठरली. या काळात ज्या स्त्रियांना कुटुंबातून अधिक सहकार्य व पाठिंबा मिळाला. त्यांनी अधिक कर्तबगारी व अधिक वेळ राष्ट्राला दिला. गांधीजींमुळे स्त्रिया राजकीय जीवनात व चळवळीत उतरल्या एवढेच नव्हे तर त्या क्षेत्रात त्यांनी स्वतंत्र भूमिकाही बजाविल्या. स्त्रियांची सोशीकता, आत्मिक सामर्थ्य, चिकाटी हे गुण

लक्षात घेऊन गांधीजींनी त्यांच्याकडे निदर्शने, सत्याग्रह व विधायक कार्यक्रमातील नेतृत्व सोपविले. कॉंग्रेसचा स्त्रियांच्या विषयीचा दृष्टिकोन उदार असल्यामुळे स्त्रियांचे अधिकार व स्वातंत्र्याची चळवळ या दोन्ही गोष्टी हातात हात घालून घडून गेल्या. हळूहळू राजकीय जीवनाच्या इतर अंगामध्येही स्त्रिया प्रवेश करु लागल्या. कामगार चळवळ, विद्यार्थी चळवळ, पक्षांच्या महिलासंघटना इत्यादीसारख्या राजकीय संघटनात त्यांची हजेरी जाणवू लागली [२]

सरोजिनी नायडू, कमला नेहरु, कस्तुरबा गांधी, कमलादेवी चट्टोपाध्याय, अरुणा असफल्ली, उषा मेहता, विजयालक्ष्मी पंडित, या स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीवर आपला ठसा उमटविला आहे. प्रसंगी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लाठीकाठीचे प्रहार सहन करुन, स्वातंत्र्यासाठी प्राणपणाला लावून कार्य केले. तुरुंगात गेल्यावर आपल्यामागे आपली पत्नी, लहान मुले, त्यांचे आजारपण, शिक्षण या सर्व व्यक्तिगत समस्यांकडे दुर्लक्ष करुन त्यांनी तुरुंगवास भोगला. तुरुंगात गेल्यावर मी ब्राम्हण, तू शूद्र ,किंवा मी उच्चशिक्षित, उच्चवर्णीय आणि तुम्ही अशिंक्षित, नीचवर्णीय हा श्रेष्ठ-कनिष्ठतेचा भेदभाव बाजूला सारून एकतेची भावना निर्माण करण्यात त्यांनी मदत केली होती. या महिलांमध्ये काही सुखवस्तू ऐश्वर्यसंपन्न घरातील जीवन जगणा-या महिलाही होत्या, पण त्यांनी तसा भेदभाव कधीच केला नाही. या महिलांमधील काहींनी स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रातही मोठीच कामगिरी केली स्वांतंत्रलढ्यात सामील होणा-या महिलांमध्ये सर्व वर्गातील व सर्व क्षेत्रातील महिलांचा समावेश होता.

## स्त्रियांनी मताधिकार मिळविण्याबाबत दिलेला लढा :

भारतात ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता 'राणीच्या १८५८ च्या जाहीरनाम्याने संपुष्टात आली व इंग्लडच्या राणीची सत्ता भारतात सुरु झाली. वेळोवेळी जागृत होणा-या भारतीय लोकांच्या असंतोषाला दडपण्यासाठी थोड्या थोड्या राजकीय सुधारणांचे तुकडे इंग्रजानी भारतीयांसमोर १९०९, १९१९, १९२७, १९३५, ला टाकले होते. अशाच १९०९ च्या सुधारित कायद्यान्वये पुरुषांना काही अटींवर मतदानाचा अधिकार देण्यात आला होता.१९१८ मध्ये इंग्लडमध्ये इंग्रज स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार मिळाला. भारतात कायदेमंडळाच्या कार्यपध्दतीच्या विकासाबरोबरच पुरुषांच्या मताधिकाराचे प्रमाण वाढत गेले. पण भारतीय स्त्रिया या महत्वाच्या अधिकारापासून वंचित होत्या. पुढे १९१९ च्या सुधारणा कायदयाने

हिंदुस्तानातील पुरुष वर्गाचा मताधिकार विस्तृत झाला तेंव्हा पुरुषांबरोबरच स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे अशी मागणी भारताच्या पहिल्या महिला प्रतिनिधी सरोजिनी नायडू यांनी केली.१९१९च्या नवीन सुधारित कायद्याव्दारे हा मुद्दा त्या त्या प्रांतातील सभागृहात मांडण्यात आला. डॉ. एनी बेझंट व मार्गारेट कझीन्स यांनी या प्रश्नाचा सतत पाठपुरावा केला. पुढे १९२१ मध्ये समाजसुधारणेचा कायदा झाला. त्यामध्ये फक्त थोड्या स्त्रियांसाठीच प्रतिनिधित्व मालमत्ता आणि शिक्षण यासारख्या काही अटीवर राखून ठेवण्यात आले. यापुढील काळात सन १९२६ पर्यंत स्त्रियांनाही पुरुषांच्या बरोबरीने मतदानाचा अधिकार भारतातील सर्व कायदेमंडळानी दिला. [३]

## स्थानिक स्वःशासनात स्त्रियांचा प्रवेश :

लॉर्ड रिपन यांच्या कारकिर्दीत हिंदुस्थान स्थानिक स्वराज्य संस्थांचे पुनरुज्जीवन झाले व त्या पाश्चात्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या धर्तीवर काम करु लागल्या. या संस्थामध्ये निवडणूकीचे तत्व मान्य झाले असले, तरी १९२३ पर्यंत स्त्रियांना मताधिकार नव्हता. पुढे १९२२ सालच्या मुंबई महानगपालिका अधिनियमाद्वारे स्त्रियांना शिक्षण व संपत्ती या अटींवर मताधिकार व निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला. याच साली मुंबईतील स्त्रियांनी महानगरपालिकेतील निवडणूकीत मतदान केले.

हा मताधिकार जरी मर्यादित स्वरुपाचा असला तरी त्याच बरोबर निवडणूका लढविण्याचे तत्व मान्य झाले. भारतात त्या अधिकाराचा मान प्रथम मुंबईतील स्त्रियांना मिळाला. यासाठी मुंबई महापालिकेत सातत्याने ठराव मांडलेले दिसतात. जाफर रेहमनुल्ला, रामकृष्ण नवलकर हे असा ठराव मांडण्यास प्रमुख होते. स्त्रियांच्या मताधिकाराच्या समर्थकांना शेवटी १९२२ साली यश आले. [४]

## महाराष्ट्रातील इतर नगरपालिकांत स्त्रियांचा प्रवेश :

महाराष्ट्रातील कांही नगरपालिकांनी इ.स.१९२६ पासून स्त्रियांना नगरपालिकेची निवडणूक लढविण्याचे अधिकार दिले असले तरी प्रत्यक्षात १९३८ पर्यंत तो अधिकार स्त्रियांनी वापरलेला दिसत नाही. श्रीमती इस्टरबाई बंदेलू व सरस्वती भदे या सोलापूर नगरपालिकेवर नामनियुक्त झालेल्या पहिल्या दोन महिला होत. कराड नगरपालिकेने १९२४

मध्ये स्त्रियांना निवडणूक लढविण्याची परवानगी दिली. परंतु १९३८ पर्यंत एकही महिला हा अधिकार बजावण्यास पुढे येत नाही हे पाहून, स्त्रियांकरिता फिरती राखीव जागा ठेवली. त्या जागेवर श्रीमती गंगाबाई जनार्दन गुणे ही पहिली महिला निवडून आली. पुण्याजवळील सासवड नगपालिकेमध्ये १९३९ साली कमलाबाई गोखले निवडून आल्या. कोल्हापूर नगरपालिकेत श्रीमती सोनुताई चव्हाण या १९२६ ते १९३८ पर्यंत सतत १२ वर्षे नामनियुक्त सदस्या होत्या. सांगली नगरपालिकेत १९४० पर्यंत स्त्रियांना सभासदत्व नव्हते. १८७६ साली स्थापन झालेल्या २४ सदस्यांच्या नगरपालिकेत १९४० साली प्रथम श्रीमती लक्ष्मीबाई अभ्यंकर या फिरत्या राखीव प्रभागातून निवडून आल्या. सातारा येथे सर्वात उशिरा, म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, स्त्रियांसाठी फिरती राखीव जागा ठेवण्याचे ठरविले. श्रीमती गीताताई काकडे त्या जागेवर, त्याचप्रमाणे नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदीही निवडून आल्या.[५] अशा रितीने १९२३ ते १९४७ च्या दरम्यान महाराष्ट्रातील नगरपालिकामध्ये महिलांचा प्रवेश झाला.

**ग्रामीण स्थानिक स्वराज्यात स्त्रियांचा प्रवेश :**

१९२७ साली झालेल्या ग्रामपंचायत विधिनियंमाप्रमाणे तीन आणे किंवा अधिक सेंस भरण्या-या व्ह.फा.अगर मॅट्रीक पास व तीन महिने त्या मतदारसंघात रहिवाशी असलेल्या सर्व स्त्रियांना पुरुषाबंरोबरच निवडणूकीचा अधिकार मिळाला. [६] परंतु या पातळीवरील स्त्रियांनी याबाबत भाग घेतल्याचे दिसत नाही. महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायतसमिती अधिनियम, १९६१ कलम ९(१) ब प्रमाणे निवडून आलेल्या सभासदांमध्ये जर स्त्री सभासदाचा समावेश नसेल, तर एक स्त्री सभासद स्वीकृत करण्याची सोय केली होती. याच कलमाची सुधारणा करून एकाऐवजी दोन स्त्रिया स्वीकृत करण्याची सोय करण्यात आली. याच अधिनियमाच्या कलम ८०(१) (१-अ) (II) अनुसार समाजकल्याण समितीवर दोन स्वीकृत सभासदांची नियुक्ती करण्याची सोय केली आहे. ज्या विषयात स्त्रियांची जाण आधिक आहे. अशा विषयावरील त्यांची नेमणूक लाभदायक ठरावी असा उद्देश या अधिनियमांच्या सुधारणेमागे आहे. स्त्रिया पुढे याव्यात व त्यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव होऊन त्यांनी राष्ट्र उभारणीच्या कामास हातभार लावावयाचा या उद्देशाने भारतीय शासनाने वरील सुधारणा हेतुपुरस्सर केल्या आहेत. [७]

**प्रतिनिधित्व :**

रोहीणी गवाणकरांनी आपल्या 'मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रुप' या पुस्तकात लिहिलेले आहे की, १९२६ पर्यंत स्त्री मताधिकार सर्व प्रांतात मान्य झालेला पाहून पुढची पायरी म्हणून हिंदुस्थान सरकारने त्यांना प्रतिनिधित्वाचा अधिकार दिला. मद्रास, मुंबई, पंजाब व मध्य प्रदेश या प्रांतातील कायदेमंडळाने त्यांची ताबडतोब अंमलबजावणी करण्याचे ठरविले. तेंव्हा कमलाबाई चट्टोपाध्याय व हन्नांना ॲजेलो यांना मद्रासहून अखिल भारतीय महिला परिषदेने निवडणूकीस उभे केले.पण त्यातील कमलादेवींचा पराभव झाला तेंव्हा स्त्रियांनी निवडणूक लढविण्याबद्दल लोकमत तयार झालेले नव्हते म्हणूनच केवळ या स्त्रियांचा पराभव झाला. हे लक्षात घेऊन अखिल भारतीय महिला परिषदेने स्त्रियांना कायदे कौन्सिलात नेमून घेण्याची मागणी केली. या मागणीला यश येऊन स्त्रियांना नेमून घेण्यातही मद्रास प्रांतानेच पुढाकार घेतला. अखिल भारतात कायदे कौन्सिलमध्ये नियुक्त झालेली व पुढे त्याचे अध्यक्ष पद भूषवणारी पहिली महिला मद्रासच्या मुथ्थुलक्ष्मी रेड्डी या होत. [८]

स्वातंत्र्योत्तर भारतात सुरवातीच्या २५ वर्षाच्या काळात स्त्रियांचा सहभाग महिला मंडळे, महिला परिषदेकरिता मर्यादित राहिला. त्यामुळे त्यांचा राजकीय सहभागही अल्पसा होता. स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट संपल्यामुळे स्वातंत्र्य चळवळ संपली आणि सर्व सामान्य स्त्रीला सामाजिक व राजकीय जीवनात सहभागाची संधी देणारे एक मोठे दालन बंद झाले.[९] ज्या काही थोड्या स्त्रिया राजकारणात व समाजकारणात सक्रिय होत्या त्या उच्च वर्गीय व सुशिक्षित स्त्रिया होत्या. सर्वसामान्य स्त्रिया मात्र राजकारणातून थोड्याशा अलिप्त होत्या. स्वतंत्र भारतात घटनेवर स्त्रियांनी विश्वास ठेवला व त्यांच्या अपेक्षा फोल ठरल्या. अगदी कमी स्त्रिया निर्णयक्षम संस्थामध्ये उच्च पदावर पोहचल्या होत्या. पण त्या स्त्रियांनाही कोणतेही दूरगामी बदल करण्यात योगदान देणे शक्य झाले नाही. यासंबधी जी कारणे सांगितली जातात ती सर्वसाधारणपणे, सर्वज्ञात अशीच आहेत. जर मुख्य प्रवाहात स्त्रिया सामील झाल्या, तर त्यांच्याकडे पाहण्याची समाजाची दृष्टी उग्र आणि पक्षपाती असते असे दिसून आले आहे. त्यातच निवडणूकीची प्रक्रिया ही फक्त खर्चीकच असते असे नव्हे तर ती अत्यंत वाईटही असते. याशिवाय राजकीय पक्षाचा रंग कोणताही असो किंवा त्याची सार्वजनिक भूमिका कोणतीही असो, कोणताही राजकीय पक्ष स्त्रियांच्या सहभागाला फारसे

सहकार्य देवून त्यांचे स्वागत करीत नाहीत.[१०] काही वेळा हेतुपुरस्कार स्त्रियांना राजकारणापासून किंवा सत्तेपासून अलिप्त ठेवण्यात येत होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जेंव्हा लोकसभेची पहिली निवडणूक लागली त्यावेळी मुंबई राज्यमतदारसंघातील तिकीट वाटपात एकाही स्त्रीला तिकीट देण्यात आले नव्हते, ही गोष्ट जेव्हा जवाहरलाल नेहरु व मौलाना आझाद यांच्या लक्षात आली.,तेव्हा त्यांनी 'महाराष्ट्रात एवढ्या सुशिक्षित कार्यकर्त्या असताना तुम्हाला एकही स्त्री तिकीट देण्यास मिळाली नाही का ? असा खडा सवाल महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षांना केला व एकातरी भगिनीला तिकीट दिलेच पाहिजे असे बजावले, तेव्हा त्यावर विचार घेवून इंदिराबाई मायदेव यांना तिकीट देण्यात आले.[११]

वास्तविक भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय हक्क प्रदान केलेले आहेत.तरीही गेली ६० वर्ष स्त्रियांच्या राजकीय सहभागाच्या बाबतीत भेदभावाचे प्रकार दिसून येतात. स्त्रियांचा निवडणूकीतील सहभाग हा राजकीय पक्षाच्या अंतर्गत पातळीवर, स्त्रियांच्या सहभागाविषयी किती जाणीव आहे तसेच सामाजिक पातळीवर मतदानाचे महत्व किती आहे यावर आधारलेला असतो. कोणत्याही राजकीय पक्षाकडून स्त्रियांमध्ये जाणीव व जागृती निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न झालेले नाहीत. याचे कारण नेहमीच असे दर्शविले जाते की, स्त्रियाचं राजकारणात सहभागी होण्यास उत्सुक नाहीत किंवा त्यांना राजकारणाविषयी ब-याच विषयांसदर्भात माहिती नसते अथवा स्त्रियांना एक संघटित दबाव गट किंवा हितसंबंधी गट मानले जात नाही. अशा प्रकारची कारणे देऊन निवडणूक प्रक्रियेमध्ये उमेदवार असलेल्या स्त्रिया आणि त्यातूनही ज्या स्त्रिया निवडून येतील, अशा स्त्रियांना सर्व प्रकारच्या निर्णयक्षम संस्थांमधून वगळणे किंवा खालच्या अर्थिक वर्गाची आणि ग्रामीण स्त्रियांची राजकीय प्रक्रियेमध्ये पूर्ण अनुपस्थिती असणे या सर्व मुद्यांचा समावेश होतो. (भारत सरकार : २८३-३०५). त्यामुळे मतदार म्हणून स्त्रियांची संख्या पुरुषांइतकीच असली तरी राष्ट्रीय आणि राज्यवेधीमंडळामध्ये स्त्रियांची टक्केवारी हळूहळू घसरत आहे. सर्वच राजकीय पक्ष स्त्रियांना उमेदवार किंवा नेत्या म्हणून पुढे येऊ न देण्यास जबाबदार आहेत हे सर्वज्ञात आहे.

राजकारणात सक्षम होतील अशा स्त्रियांची कमतरता नाही. त्यातील ब-याच जणी उत्तम प्रकारे त्यांचे प्रश्न, समस्या मांडू शकतात. त्यांना राजकारणाचा अनुभव आहे. तळगावातील जनतेच्या समस्यांचे ज्ञान आहे. परंतु त्यांची उमेदवार म्हणून निवड होत नाही.

आणि आत्ताच्या प्रचलित स्थितीमध्ये त्यांना राजकारणात शिरण्याची इच्छाच होत नाही. ज्या थोड्या स्त्रिया संसदेमध्ये पोहचल्या आहेत, त्यांना त्यांच्या पक्षांच्या आदेशाप्रमाणे स्त्रियांच्या समस्यांबाबत झुकविण्यात येते किंवा अडथळे आणले जातात. त्यामुळे विधिमंडळातील स्त्री प्रतिनिधींच्या एकजुटींना सारखे आव्हान दिले जाते. स्त्रियांच्या चळवळीची ताकत सर्वसामान्य स्त्रियांच्या, ज्यांच्या समस्या गंभीर आहेत त्यांच्याशी सध्याच्या सत्तेच्या रचनेमध्ये प्रतिकार करण्याइतकी किंवा स्त्रियांच्या हक्काच्या लढ्यामध्ये परिणामकारक होईल इतकी तुल्यबळ नाही [१२]

राजकारणातील स्त्रियांचा सहभाग वाढल्याशिवाय स्त्री लोकप्रतिनिधींची संख्या वाढणार नाही. एकूण देशाच्या लोकसंख्येत ५०% असणा-या स्त्रियांचे राजकारणातील प्रमाण मात्र अत्यल्प दिसते. राजकारणात स्त्रियांचा सहभाग समजून घेताना, प्रथम राजकीय सहभाग ही संकल्पना स्पष्ट करणे गरजेचे आहे.

पक्षीय राजकारणावर थेट प्रभाव पाडणा-या कृतींमधील सहभाग म्हणजे 'राजकीय सहभाग' असे ढोबळमानाने मानले जाते. अधिक व्यापक अर्थाने सत्तेसंबंधीत प्रक्रियांवर किंवा सत्ता संबंधावर ज्याचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्रभाव पडू शकतो अशा सर्व कृतींचा समावेश 'राजकीय सहभागात केला जातो. या व्यापक अर्थाने पक्षीय राजकारणातील सहभागाच्या जोडीलाच कामगार चळवळ, किसान चळवळ, पर्यावरण संरक्षणाची चळवळ, स्त्रियांची चळवळ अशा राजकीय प्रक्रियेचा घटक असणा-या कोणत्याही कृतींतील सहभाग हा राजकीय सहभागच मानला जाऊ शकतो. सत्तेशी संबंधित असणारी किंवा सत्तेवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या प्रभाव पाडणारी प्रत्येक गोष्ट व्यापक अर्थाने राजकीयच असते.

'अल्मंड आणि आणि वेब' या विचारवंतांनी दर्शविल्याप्रमाणे 'राजकारण म्हणजे सत्ता आत्मसात करणे किंवा राजकीय घडामोडीमध्ये सहभागी होऊन एखाद्या ठरावाला निश्चित करण्याचे माध्यम होय.

या राजकीय सहभागाचे तीन नमुन्यामध्ये विस्तृतपणे विश्लेषण केले आहे.

**१. संशोधक सहभाग**

**२. संघटनात्मक सहभाग**

**३. प्रातिनिधिक सहभाग**

संशोधक सहभाग म्हणजे राजकीय कार्यकर्त्यांनी स्वतःला समस्या सोडविण्यामध्ये गुंतवून घेऊन शासकीय तंत्राचा वापर लोकांच्या भल्यासाठी करणे असा याचा अर्थ होतो.

संघटनात्मक सहभाग म्हणजे एखादी राजकीय कार्यकर्त्या, एखादी राजकीय बाब प्रभावीपणे न मांडता समाजामध्ये एखाद्या गोष्टीचे संघटनात्मक आणि क्रियाशील मोहिमेसारखे विश्लेषण करतो.

प्रातिनिधिक सहभाग म्हणजे संशोधकासारखे स्वतःचे प्रतिनिधित्व न करता ज्या विभागाचे तो प्रतिनिधित्व करतो त्या विभागातील समस्या सोडविणे होय.'किर्कपॅर्टिक' यांनी बळकट प्रेरणात्मक राजकीय कृती दर्शविलेली आहे. त्यांच्या मतानुसार सार्वजनिक घटना प्रभावीपणे मांडण्याची इच्छा, प्रभावाचा अभ्यास व तो राजकीय प्रभाव मांडण्याची इच्छा यासाठी कौशल्याची गरज असते.राजकारण आणि राजकीय सहभाग याचा नेमका अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल.

राजकारण हे दोन पध्दतींनी सांगता येईल, एखादी व्यक्ती कार्यलयांना नियंत्रणामध्ये ठेवण्याचा प्रयत्न करते व दुसरे म्हणजे एखाद्या वादाच्या किंवा चर्चेच्या विषयाबद्दल नागरी समाजाशी संबंधित राहून प्रश्न सोडवणुकीसाठी प्रयत्न करणे होय. आपण राजकीय सहभागाशी संबंधित असल्याने राजकीय समाजीकरण महत्त्वाचे आहे. व्यक्तीचे राजकीय सामाजीकरण अगदी लहाणपणापासून सुरु होते. लहान मूल आपले आई-वडील, कुटुंबातील इतर व्यक्ती, मोठी भावंड, मित्र, शिक्षक यांच्याकडून राजकीय सामाजीकरणाचे धडे गिरवते, तर प्रौढांच्या बाबतीत त्यांच्या समूहसंबंधातून शैक्षणिक संस्थामधून व त्यांच्या आत्मविश्वासाबद्दलच्या जाणीव करुन देणा-या कृती की ज्या त्यांच्या सभोवती ही घडत असतात अशा समाजातील अनेक संस्थामधून सामजीकरणाची सुरवात होते. त्यामुळे त्या व्यक्तीला सार्वजनिक कार्यामध्ये स्वतःला सहजपणे सहभागी होण्याची व स्वतःचा विकास करुन घेण्याची संधी मिळते.

अनेक अभ्यासकांनी दर्शविल्याप्रमाणे राजकीय सहभाग हा स्त्री आणि पुरुषांच्या लिंगसापेक्षतेवर आधारित आहे. पुरुषांशी तुलना करता स्त्रियांचा औपचारिक सहभाग कमी आहे. त्यामध्ये राजकारण हे पुरुषांचे कार्यक्षेत्र ही भावना, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, पारंपारिक समाजाची बंधने, कौटुंबिक जबाबदा-या, समाजतील हिंसेचा वापर, गैरवर्तन, मतदानकेंद्रे ताब्यात घेण्याचे प्रयत्न, पुरुषप्रधान संस्कृती, मतदानाच्या वेळचा हिंसाचार,

शिक्षण या सा-यांमुळे महिलांच्या राजकीय सहभागावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. तरीही अनौपचारिक सहभागामध्ये आज स्त्रियांच्या प्रमाणात विशेष करुन भारतीय स्त्रियांच्या प्रमाणात सुधारणा होत आहे.

**महिला आरक्षणाची गरज :**

भारतात अगदी प्राचीन काळापासून पुरुषप्रधान संस्कृती चालत आलेली आहे आणि पुरुषांचा राजकीय सहभागही पूर्वीपासूनच दिसून येतो. मात्र एकूण देशाच्या लोकसंख्येत ५०% वाटा उचलणा-या स्त्रियांचा राजकारणातील किंवा सत्तेतील सहभाग मात्र अगदीच नगण्य होता व आहे. स्वातंत्र्यप्राप्तींनंतर प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांना पुढे आणण्याचे स्त्री-पुरुष समानतेचे प्रयत्न विविध क्षेत्रात जोमाने चालू असलेले दिसतात अगदी अर्थकारण, शिक्षण, साहित्य, क्रीडा-कला इ. प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी मोठमोठी आव्हाने स्वीकारली व लीलया पेललीही. पण राजकारणाच्या क्षेत्रात मात्र त्यांचा सहभाग समाधानाकारक तर नाहीच उलट त्यांची या क्षेत्रात पीछेहाट झालेली दिसते. समाजातील उच्चवर्गीय स्त्रिया किंवा अगदी तळाच्या स्तरातील स्त्रियांचा राजकीय सहभाग अगदीच अल्प आहे. त्यामानाने मध्यमवर्गीय स्त्रिया वेगवेगळया पक्षात कार्य करताना दिसतात. पण त्यांचे प्रत्येक पक्षातील संख्याबळ पाहिले तर ते इतके अल्प दिसते की आपल्या स्वतःच्या हिंमतीवर, एकजूट होऊन या एखादी मोठी कर्तबगारी सिध्द करु शकतील किंवा एखादे महत्त्वाचे पद मिळवू शकतील असे चित्र दिसत नाही.

स्त्रियांचा विकास, प्रगती यासारख्या मूलभूत विषयांना पक्ष पुढा-यांकडूनही अग्रक्रम मिळालेला दिसत नाही. उलट पुढा-यांच्या तोडीचे कर्तृत्व दाखविणा-या स्त्रीच्या कार्यात कावेबाजपणाने अडथळा निर्माण केला जातो. तिचे नेतृत्व हे सैध्दांतिकदृष्ट्या मान्य करताना दिसतात, परंतु व्यवहारात अशी नेतृत्वाची धुरा अनेक वेळा असेही अनुभवाला येते की, सत्तेकरिता भांडणा-या पुरुषांना बाजूला सारण्याकरिता स्त्रियांची यादी पुढे सरकवली जाऊन त्यांना सचिव पदाधिकार दिले जातात. जो पर्यंत एखादी स्त्री, कार्यकर्ता पातळीवर पुढे येण्यासाठी धडपडत असते, तो पर्यंत तिला प्रसंगी उत्तेजन देऊन तिचे कौतुकही होते, पण ती जेव्हा आपल्या बरोबरीला येते आहे व कदाचित आपल्याला डावलून पुढेही जाईल अशी नुसती शंका आली तरी तिच्या मार्गात अनेक अडथळे आणले जातात [१३] त्यामुळेच संसदेत

व विधीमंडळात स्त्रियांचे ३३% आरक्षणाचे विधेयक अजूनही पास झालेले नाही. नुकतेच संसदेच्या बजेट अधिवेशनात हे विधेयक पुन्हा नव्याने १०८ वे घटना दुरुस्ती विधेयक म्हणून सादर करण्यात आले आहे. तथापि, त्याचे कायद्यात रुपांतर होण्याची शक्यता कमी आहे.

आज येनकेन प्रकारे सत्ता हस्तगत करणे व ती टिकविणे हेच एकमेव प्रमुख कार्य प्रत्येक पक्षाचे बनू पाहत आहे. तसेच राजकीय चारित्र्यहनन, हेवेदावे, राजकारणातील गढूळपणा यामुळे सर्वसामान्य स्त्रिया अजूनही राजकारण हे पुरुषांचे क्षेत्र आहे असे मानतात. स्त्रीला राजकीय पटलावरही पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळावेत किंबहूना निर्णय प्रक्रियेत तिचा सहभागही पुरुषांइतकाच असावा. या स्त्रीच्या सबलीकरणाच्या हेतूने त्यांचा राजकीय सहभाग वाढवून, त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी आरक्षण महत्त्वाचे आहे. मेधा नानिवडेकर यांनी 'महिलांचा सत्ता सहभागः राखीव जागा धोरणाची फलश्रुती ' या अहवालात म्हटल्याप्रमाणे सर्व साधारणपणे ज्यांची उपेक्षा झाली आहे, नुकसान झाले आहे, अशा गटांना सकारात्मक कृतींच्या आधाराची किंवा भारतानध्ये सर्वसाधारणपणे ज्याला आरक्षण असे म्हटले जाते, त्याची गरज असते आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्यातील उणीवांबद्दल भरपाई करण्यासाठी त्यांना संरक्षक कायद्याची गरज असते. आपल्या समाजात स्त्रियांचे स्थान पुरुषांच्या तुलनेत दुय्यम आहे आणि हे दुय्यम स्थान बदलले पाहिजे हे आता जवळजवळ सर्वमान्य झाले आहे. पण कोणतीही विषमता नष्ट करण्यासाठी ज्या ज्या वेळी कायदेशीर आणि घटनात्मक तरतुदी केल्या गेल्या, त्या त्या वेळी ती वादग्रस्त बाब ठरली. अशाप्रकारे आरक्षण देण्यामागचा प्रमुख हेतू समाजामध्ये जे घटक दुर्बल राहिले आहेत, त्यांना घटनात्मक संरक्षण देणे व त्यांच्या सबलीकरणाचा प्रयत्न करणे हा असतो. समाजातील एका विशिष्ट समाजावर, जातीवर किंवा घटकावर रुढी परंपरेने अन्याय होत असेल तर असा झालेला अन्याय कायद्याने दूर करुन, त्यांना सबल बनविण्यासाठी घटनात्मक संरक्षण देणे हा आरक्षणाचा प्रमुख उद्देश असतो. समाजातील विविध घटकांचा समतोल साधण्यासाठी कृत्रिमरित्या सुरु केलेली ही बाह्यप्रक्रिया आहे. सबलीकरणाचा मुख्य उद्देश समाजातील विविध सत्ताकेंद्रामध्ये जी स्त्री-पुरुष विषमता आहे तिला आव्हान देणे हा आहे.

सबलीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रीची स्वतःबद्दलची सकारात्मक प्रतिमा निर्माण होतो. तिचे सत्तासंबंधाचे आकलन विकसित होणे, कोणत्याही विषयाचा परिस्थितीचा चिकित्सक

विचार करण्याची सवय लागणे इ. क्रिया अंतर्भूत असल्या तरच ती शोषणमुक्त आणि समतायुक्त अशा पर्यायी समाजाचे स्वप्न पाहू शकेल.[१४] भारतीय राज्य घटनेने सर्वजणांना धार्मिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व इत्यादी सर्व क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचे हक्क प्रदान केले आहेत आणि अशा रीतीने समानता प्रस्थापित करण्यामध्ये येणारे अडथळे जरी औपचारिक पातळीवर नष्ट केले तरी केवळ तेवढ्यामुळेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक बदल होत नाहीत. भारतासारख्या विविधांगी आणि विविध पातळीवर असलेल्या समाजात तर हे काम खूपच अवघड असते कारण येथे कित्येक वर्षापासून स्त्री-पुरुष, जात, धर्म वंश इत्यादी बाबतीत विषमता फार खोलवर रुजली आहे. पितृप्रधान समाज व्यवस्थेवर आधारित संस्कृती आणि त्यामुळे निर्माण झालेले पूर्वग्रह, विशेषतः स्त्रिया, कनिष्ठ जाती आणि वंश, हे दैनंदिन आयुष्यात आणि सरकारी धोरणावर प्रतिबिंब पाडल्याशिवाय राहत नाहीत. भारताच्या लोकसंख्येमध्ये स्त्रियांची संख्या जवळजवळ ५०% आहे. परंतु आजपर्यंत स्त्रियांना संसद व विधिमंडळात योग्य असे प्रतिनिधित्व मिळालेले नाही.

भारतामध्ये समाजातील अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागास गटांसाठी राखीव जागांचे तत्व खूप पूर्वीच स्वीकारले गेले आहे. आणि ओ.बी.सी., आणि दुर्बल घटक यांच्यासाठी स्वीकारण्यात आले तर स्त्रियांसाठी हे आरक्षण अलिकडे ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीने लागू करण्यात आले. समाजातील विशिष्ट गटांसाठीचे आरक्षण हा नेहमीच स्फोटक व विवाद्य विषय राहिला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १६ सार्वत्रिक निवडणूका होऊनही स्त्रियांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व ९% पर्यंतही पोहचू शकलेले नाही. भारताशेजारीलच पाकिस्तान व बांग्लादेश या प्रगल्भ लोकशाहीची सुरवात न झालेल्या देशांतील संसदेत हे प्रमाण अनुक्रमे २२% व १७% इतके आहे. या पार्श्वभूमीवर जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्रात स्त्रियांचे संसदेतील प्रतिनिधित्व ९% ही नसणे हा विरोधाभास खेदजनक आहे.

१९८७-८८ साली देशाचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधीनी पंचायत राज्य संस्थेला नवे वळण देण्याचा प्रयत्न केला. स्थानिक स्वराज्य संस्थाना घटनात्मक दर्जा देणे, त्यात स्त्रियांना ३०% आरक्षण देणे, अशा काही चांगल्या तरतुदी असलेले घटना दुरुस्ती विधेयकही त्यांच्या सरकारने तयार केले होते. पण ते मंजूर होऊ शकले नाही, पुढे संसदेने

२२ डिसेंबरला ७३ वी घटना दुरुस्ती ग्रामीण स्वराज्य संस्थाशी संबंधित, तर २३ डिसेंबर १९९२ ला ७४ वी घटना दुरुस्तीन्वये शहरी स्थानिक संस्थाशी संबंधित महत्वाच्या तरतुदी संम्मत केल्या, यावेळी केंद्रशासनाने स्त्रियांसाठी ३३% आरक्षणाची घटना दुरुस्ती अंमलात आणली असली, तरी महाराष्ट्र शासनाने १९९० मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थात ३०% जागा स्त्रियांसाठी ठेवण्याचे राखीव जागांचे धोरण शहरी स्थानिक स्वराज्य संस्थात व पंचायत राज्य संस्थात अंमलात आणले होते. ३०% राखीव जागांचे धोरण जाहीर झाल्यानंतर कोल्हापूर महानगरपालिका ही हे धोरण राबविणारी पहिलीच महानगपालिका ठरली. १९९० मध्ये महिलांना ३०% राखीव जागा दिल्यानंतर पहिली निवडणूक कोल्हापूर महानगरपालिकेची झाली. कोल्हापूर महानगरपालिकेत राखीव मतदार संघातून निवडून आलेली महिला नगरसेविकांची पहिली फळी १९९० ला कार्यरत झाली. इथे विचार करण्याजोगी महत्वाची गोष्ट म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थातील महिलांसाठी राखीव जागा, कोणत्याही प्रकारची सार्वत्रिक चर्चा घडवून न आणता अचानक अंमलात आणल्या गेल्या होत्या. कोणत्याही स्त्री संघटनांच्या दबावामुळे किंवा स्त्री हक्क संबंधात आंदोलने करणा-या गटांचा परिणाम म्हणून हे धोरण संम्मत झालेले नाहीत. अशा धोरणाला विरोध करणे हा राजकीय शहाणपणा नसल्यामुळे ब-याचदा विरोध प्रकट होत नाही. कारण वंचित घटकांच्या न्याय हक्कांसाठी होणा-या उपाय योजनेत आपण बाधा आणित आहोत असे चित्र निर्माण होणे कोणाच्याही सोयीचे नसते. त्यामुळे हा विरोध प्रगट न होता आतल्या-आत धुमसत मात्र राहतो [१५]

३३% आरक्षण मिळाल्यानंतर सुरवातीच्या काळातील स्त्रियांचा राजकीय सहभाग व सध्या त्यांच्यामध्ये झालेले बदल हे मेधा नानिवडेकरांनी पुढील प्रमाणे आपल्या 'महिलांचा सत्तेतील सहभाग' राखीव जागा धोरणाची फलश्रुती या अहवालात शब्दांकित केले आहेत. सुरुवातीला राजकारण हे फार धका-धकीचे, पुरुषी वर्चस्व व गुंडपुडाईचे क्षेत्र आहे, आपल्या स्त्री जातीला हे झेपणार नाही अशा भीतीपोटी किंवा परंपरेने अंगी भिनवलेल्या संकोच्यापायी निवडणूकीत उभ्या राहण्यास स्त्रिया तयार नसत, स्त्री उमेदवार शोधावे लागत. गाव तालुक्यातील कर्तबगार 'घरच्या' कठपुतळ्या बाय्कांना उमेदवारीची झूल बळे बळेच चढवावी लागत होती. निवडून आल्यावरही त्या पंचायत राज्य संस्थेच्या कारभारात फारसे लक्ष घालत नव्हत्या. घरी बसूनच मिटींगच्या कागद पत्रांवर डाव्या हाताचे अंगठे

उठवत होत्या पण हे चित्र हळूहळू पालटत आहे. सुशिक्षित स्त्रियातर आत्मविश्वासाने स्थानिक स्वराज्य संस्थेत वावरु लागल्या आहेत. पण खेड्यातील निरक्षर स्त्रियांही भीड चेपून पुढे येत आहेत. अनुभवाने त्यांचे अज्ञान, अनास्था व औदासिन्य दूर होत आहे.

## नागरी स्थानिक स्वशासनात स्त्रियांचा सहभाग

महाराष्ट्रात सर्वप्रथम मुंबई येथे महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली. १९७५ पर्यंत महाराष्ट्रात मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर व कोल्हापूर या पाच शहरात महानगरपालिका अस्तित्वात आल्या. यापैकी कोल्हापूर महानगपालिकेची स्थापना झाली असली तरी तिची निवडणूक १९७८ पर्यंत झाली नव्हती व तिचा कारभार प्रशासकाकडे होता. मुंबई नगरपालिकेचा जन्म १८७४ मध्ये झाला. मुंबई महानगरपालिकेच्या १९२३ च्या निवडणुकीत श्रीमती सरोजनी नायडु, बच्चूबाई लोखाला, हॅरी हॅडगीकसन व अवंतिकाबाई गोखले इत्यादी स्त्रिया निवडून आल्या [१६]

पुणे महानगरपालिकेची स्थापना १९५० साली झाली. १९५२ पर्यंत बाराजणांचे एक सल्लागार मंडळ महानगरपालिकेचा कारभार पाहत होते. त्यात भिमाबाई दांगड यांचा समावेश होतो. १९५२ च्या निवडनुकीत श्रीमती नलिनी शिंदे या कॉंग्रेसच्या तिकीटावर निवडून आलेल्या एकूलत्या एक महिला होत्या [१७]

नागपूर महापालिका १९५२ साली अस्तित्वात आली. नागपूर शहर पूर्वी मध्यप्रदेशामध्ये होते. १९५२ साली द्वारकाबाई महादेव देऊसकर ही जनसंघाची कार्यकर्ती नागपुर नगरपालिकेवर निवडुन गेली [१८]

सोलापूर नगरपालिकेचे १९६४ साली महानगरपालिकेत परिवर्तन झाले. सोलापूर नगरपालिकेत श्रीमती काशीताई कुलकर्णी व रमाबाई पित्रे यांनी क्रियाशील भाग घेतला. पुष्पा चिंदंरकर व निर्मला ठोकळ यांच्या कार्याचा वेगळाच ठसा या महानगरपालिकेच्या कार्यावर उमटलेला दिसतो [१९]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्रात मृणालगोरे, अहिल्याबाई रांगणेकर, प्रमिला दंडवते, शालिनीताई पाटील, प्रेमलाताई चव्हाण, इ. हातांच्या बोटावर मोजण्याइतक्या महिला खासदार झाल्या. स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणावर नजर टाकली तर सरोजिनी नायडू,

विजयालक्ष्मी पंडित, अरुणाअसफल्ली या मोजक्या स्त्रियाच ख-या अर्थाने देशाच्या राजकारणात सक्रीय होत्या. पुढे इंदिरा गांधीच्या रुपाने संपूर्ण देशाने एक खंबीर, आत्मविश्वासू व निडर नेतृत्व अनुभवले. इतर कोणत्याही पुरुष पंत प्रधानाच्या काळात झालेले नाहीत. इतके खंबीर निर्णय या पंतप्रधानांच्या काळात घेतले गेले. व तितक्याच काटेकोरपणे त्या निर्णयाची अंमलबजावणीही झाली. श्रीमती इंदिरा गांधींची वादग्रस्त पण तितकीच यशस्वी कारकीर्द भारताच्या इतिहासात आपले वेगळे स्थान निर्माण करुन गेली.

## सदर अभ्यासाचे महत्व :-

आज महिलांच्या सबलीकरणाची चळवळ मोठया प्रमाणात देशभर सुरू आहे. मात्र तरीही अनेक स्तरावर स्त्रियांची उपेक्षाच होताना दिसते. स्त्रियांच्या राजकीय सबलीकरणाच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढत आहे.

महिला आणि राजकारण हा अभ्यासविषय बराच काळ दुर्लक्षित राहिला होता. पण महिलांसाठी राखीव जागा ठेवण्याच्या निर्णयानंतर महिला आणि राजकारण या विषयाचे अनेक पैलू समोर येवू लागले, व त्या विषयाच्या संशोधनातही बरीच भर पडली. महिलांचा राजकारणातील सहभाग या विषयावरील बरेच लेखन सध्या उपलब्ध आहे. त्यामध्ये मुख्यत्वे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक घटकांचा किंवा राजकीय सामाजिकीकरणाच्या प्रकियेचा विचार केला गेला आहे [२०] पण यामुळे त्यांच्या व्यक्तिगत जीवनात घडून आलेल्या बदलाचा तसेच त्यांच्या सार्वजनिक जीवनात घडणाऱ्या बदलाचा अभ्यास होणे महत्वाचे आहे.

विधानसभा, लोकसभेत स्त्रियांसाठी आरक्षणाचा विषय अद्यापही प्रलंबित असल्यामुळे स्थानिक स्तरावर स्त्री लोकप्रतिनिधींच्या अभ्यासाचे, आजच्या संदर्भात खूपच महत्व आहे. विशेषतः स्त्री-पुरूष लोकप्रतिनिधींचा तुलनात्मक अभ्यास, राजकीय आरक्षणाच्या चर्चा विश्वासाठी आवश्यक आहे. महिला आरक्षण अंमलात आल्यावर केवळ स्त्री - लोकप्रतिनिधींचा अभ्यास मोठया प्रमाणात केला गेला. पण इतका अभ्यास होऊनही स्त्री - पुरूषांचा तुलनात्मक अभ्यास महापालिका स्तरावर झाला नसल्याने या विषयीचा अभ्यास होणे गरजेचे वाटले. आरक्षणामुळे महिलांना राजसत्तेत वाटा मिळाला असला तरी, त्यांचा सहभाग फक्त संख्यात्मकच आहे, की गुणात्मक आहे, हे पाहाणे ही महत्वाचे वाटते.

नगरसेविंकांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक राजकीय तपशील मिळवून प्रामुख्याने कोणत्या महिलाना राखीव जागा धोरणाचा फायदा मिळाला, आपल्या प्रभागात अग्रक्रमाने करण्याची कामे, कामकरण्याची शैली, स्त्री प्रश्नाकडे पाहण्याचा दोघांचा दृष्टिकोन, त्यांच्या प्रेरणा या सर्व बाबतीत महिला आणि पुरूष नगरसेवकात कोणता फरक आढळतो? नागरी प्रश्न सोडविताना नगरसेविकांमध्ये ' स्त्रियांचा असा खास दृष्टीकोन आहे का? हे बघणेही महत्वाचे वाटते.

महिलांचे प्रश्न सोडविण्यात आणि त्यांच्यात राजकीय जाणिवा वाढविण्यात नगरसेविंकाचा सहभाग कितपत आहे? महिलांना राजसत्तेत वाटा मिळाल्या नंतर त्या अनुषंगाने घेण्यात येगारे निर्णय त्या किती कार्यक्षमतेने घेवू शकतात किंवा घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी, त्यासाठी वेळेचे नियोजन, निधी उभा करणे. या गोष्टी त्या किती प्रभावीपणे हाताळतात. हे पाहाणेही गरजेचे आहे. पुरूषांच्या तुलनेत महिलांमधील निर्णय क्षमता, नेतृत्व गुण, एखादया समस्येचा खोलवर अभ्यास करणे, तिचे गांभीर्य समजून घेणे, प्रभागातील विकास कामांसाठी लागणारा निधी उभा करताना आमदार फंड, खासदार फंड किंवा शासनाचे इतर फंड यामधून पुरुषांच्या तुलनेत जास्तीत जास्त फंड मिळविण्यात यशस्वी होतात का? एखादी समस्या सोडविण्यासाठी आपल्या अधिकाराचा वापर त्या कसा करतात. हे पाहणे ही महत्वाचे वाटते. फक्त सत्तेत वाटा मिळाला म्हणजे महिलांचे सबलीकरण झाले असे नाही. त्यामुळे त्यांना मिळालेल्या संधीचा त्या कशाप्रकारे उपयोग करून घेतात हे ही पाहावे लागेल. स्त्रियांबरोबरच पुरूषांची काम करण्याची पध्दत सामाजिक आर्थिक, राजकीय परिस्थिती पहाणे व वरील सर्व मुद्यांवर दोघांची तुलना करुन त्यांच्यातील काम करण्याच्या पध्दती मधील साधर्म्य व भेद तपासणे अनिवार्य वाटते. स्त्रियांच्या राजकीय सहभागाविषयीचे संशोधन भारतात अजूनही प्राथमिक अवस्थेत आहे. आजपर्यंत झालेला अभ्यास हा आमदार- खासदार, स्वांतत्र्य लढयात भाग घेतलेल्या स्त्रिया असे व्यक्तिसापेक्ष वा महानगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्था अशा संस्थांचे अभ्यास झाले. याच बरोबर ' महिलांचा राजकारणातील सहभाग ' या विषयावरील ही बरेच लेखन सध्या उपलब्ध आहे. पण महानगरपालिका स्तरावर स्त्री - पुरूषांचा तुलनात्मक अभ्यास झाला नसल्याच्या पार्श्वभूमीवर या अभ्यासाचे महत्व अधोरेखित होते.

या पार्श्वभूमीवर स्त्री - पुरुषांच्या राजकीय सहभागावर लिंगसापेक्ष काय फरक पडतो. स्त्रियांना स्त्री असल्यामुळे महिला आरक्षणाच्या संदर्भात कोणत्या संधी आपोआप उपलब्ध होतात. तर स्त्री असण्यामुळे कोणत्या अडचणींना तोंड दयावे लागते. याचा राजकीय सहभागाच्या, विविध पैलूंच्या अंगाने मागोवा घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत अभ्यासात करण्यात आला आहे.

# संदर्भ


१. नानिवडेकर मेधा - महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा - संपादक मेधा नानिवडेकर, प्रकाशन - प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६ पृ. ७

२. गवाणकर रोहिणी - मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रुप - प्रकाशक - आदित्य प्रकाशन, १९८६, पृ. १ व २

३. कित्ता १९८६, पृ. १५९

४. गवाणकर रोहिणी - मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रुप - प्रकाशक - आदित्य प्रकाशन, १९८६, पृ. १५८

५. कित्ता १९८६, पृ. १५९

६. कित्ता १९८६, पृ. १५९

७. कित्ता १९८६, पृ. १५९

८. कित्ता १९८६, पृ. ९१०

९. नानिवडेकर मेधा - महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा - संपादक मेधा नानिवडेकर, प्रकाशन - प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६ पृ. ७

१०. कस्तुरी लीला - समकालीन भारतातील नागरी स्त्रिया - संपादन - रेहाना घडियाली - प्रकाशन - डायमंड पब्लिकेशन , २००८ पृ. ३८८

११. गवाणकर रोहिणी ,उपरोक्त १९८६, पृ. १४९

१२. कस्तुरी लीला, उपरोक्त २००८ पृ. ३८८-३८९

१३. गवाणकर रोहिणी -उपरोक्त, १९८६, पृ. २७९

१४. नानिवडेकर मेधा - उपरोक्त, मुंबई १९९७-९८ पृ. ७

१५. कित्ता , मुंबई १९९७-९८ पृ. ८

१६. गवाणकर रोहिणी, उपरोक्त पृ. १६०

१७. कित्ता, १९८६, पृ. १६४

१८. कित्ता १९८६, पृ. १६६

१९. कित्ता १९८६, पृ. १६७

२०. नानिवडेकर मेधा - उपरोक्त - १९९७ पृ. १